# विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी डॉ. भणगे



**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी डॉ. रवींद्र भणगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. प्रकाश पवार यांचा तीन वर्षांचा कालावधी संपला. त्यानंतर डॉ. भणगे यांनी सोमवारी विभागप्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. भणगे २०१३ पासून राज्यशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी राजाराम महाविद्यालय, विवेकानंद शिक्षण संस्थेत काम केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी घेतली आहे. राज्यशास्त्र विषयातील त्यांची तीन संशोधन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी होऊन संशोधन निबंध सादर केले आहेत.

पुढारी

संक्षिप्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना सोक्टास कंपनीचे सदानंद गुप्ता आदी.

(छाया: तय्यब अली)

# कौशल्य विकास केंद्रासाठी 'सोक्टास' कडून दोन लाख रुपयांचा निधी प्रदान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अतर्गत दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश सोक्टास कंपनीतर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाच्या कौशल्य विकासाच्या कार्याला अधिक चालना देण्यासाठी हा निधी देताना आनंद होत असल्याचे सोक्टास इंडिया कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांनी सांगितले. यावेळी डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा मरु देऊ नये

**डॉ. आ. ह. साळुंखे यांचे प्रतिपादन**

**जयसिंगपूर :** विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा मरु देऊ नये. जर जिज्ञासा मेली तर शरीर जिवंत असूनही मेल्यासारखे आहे. अभ्यास वेगळा आणि ज्ञान वेगळे. ज्ञान आत्मसात करा. केवळ परीक्षार्थी बनू नका. स्पर्धेच्या जगामध्ये टिकण्यासाठी मनन चिंतन करा. अपार कष्टाची सवय ठेवा, असे मत ज्येष्ठ विचावंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले. जयसिंगपूर कॉलेजच्या पदवीदान समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. सी. टी. कारंडे होते. संस्थाध्यक्ष डॉ. सुभाष अडदंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. डॉ. ए. ए. पुजारी यांनी पदवी प्रमाणपत्र वितरण वाचन केले.सूत्रसंचलन डॉ. सौ. सुनंदा शेळके व एस. डी. चौगुले यांनी केले. आभार डॉ. नितिश सावंत यांनी मानले.

# सोळांकूर महाविद्यालयाचा ५ रोजी पदवीदान समारंभ

सरवडे : राधानगरी तालुक्यातील सोळांकूर येथील श्री व्यंकनाथ शिक्षण मंडळ, संचलित यशवंतराव पाटील सायन्स महाविद्यालयाचा ५ एप्रिल रोजी पदवीदान समारंभ आयोजीत केला आहे. शिवाजी विद्यापीठाचे डॉ. एस. डी. डेळेकर यांच्या हस्ते व संस्था सचिव ए. वाय. पाटील, अध्यक्ष आर. वाय. पाटील यांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार असून विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य जी.जी. चौगले यांनी केले आहे.

# 'रस्त्यावरील अपघात, द्या माणुसकीचा हात' वर आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ येथील राजर्षी शाहू सभागृहामध्ये मंगळवारी (दि. २) दुपारी ४.३० वा. 'रस्त्यावरील अपघात, द्या माणुसकीचा हात' यावर व्याख्यान आयोजित केले आहे. अशी माहिती कोल्हापूर अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप पाटील व सचिव डॉ. उमेश जैन यांनी दिली आहे.

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचा स्थापना दिवस दरवर्षी १ मे रोजी साजरा केला जातो. यावर्षी संघटनेचा ३६ वा वर्धापनदिन हा विविध सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा करण्यात येणार आहे. संघटनेचे राज्यात १८०० हून अधिक सभासद आहेत. यावर्षी संघटनेने प्रामुख्याने रस्ते अपघात तसेच डॉक्टर पोलीस सुसंवाद असे विषय निवडले आहेत. या सामाजिक उपक्रमांचा जनतेला निश्चितपणे लाभ होणार असून डॉक्टर–रुग्ण संबंध सुधारण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. नितीन देशपांडे (कोल्हापूर आणि सचिव डॉ. प्रकाश सिगेदार (जालना), प्रसार प्रमुख डॉ. संजोग कदम आणि सर्व पदाधिकारी यांच्यामार्फत पत्रक प्रसिद्ध केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या संकल्पनांना इनक्युबेशन सेंटरचे प्रोत्साहन

## आष्टा येथील डांगे इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांचे संशोधन : १२० ल्युमेन परवॅट क्षमतेच्या एलईडी ट्युबलाईटची निर्मिती

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी १२० ल्युमेन परवॅट क्षमतेच्या एलईडी ट्युबलाईटची निर्मिती केली आहे. या ट्युबलाईटमुळे वीजबील कमी येते, तसेच याला तीन ते पाच वर्षांची गॅरंटी-वॉरंटीही आहे. या एलईडीचा वापर घरात व शक्यतो औद्योगिक कंपनीत केला जाऊ शकतो. आतापर्यंत या विद्यार्थ्यांनी एएमएलईडीच्या नावाने ३५ हजार ट्युबलाईटची निर्मिती करून विक्री केली आहे.

आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संकेत शिंदे या विद्यार्थ्याने तब्बल एक वर्ष संशोधन करून १२० ल्युमेन परवॅट क्षमतेची एलईडी ट्युबलाईट तयार केली आहे.

शिवाजी विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन दिले जाते. या इनक्युबेशन सेंटर अंतर्गत डांगे कॉलेजच्या बाबू पवार, अक्षय गवस, आदर्श देशमुख, स्नेहल सुतार, मोनाली माळी, अपूर्वा डोमने यांनी कृषीपंपाचे संशोधन केले आहे. यासाठी या विद्यार्थ्यांना इनक्युबेशन सेंटरचे समन्वयक मनिष पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'उद्यम समागम' उपक्रमातील स्टॉलवर माहिती देताना आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे विद्यार्थी.

विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनातून मोबाइलद्वारे एका क्लिकवर पाण्याचा पंप चालू-बंद करणे शक्य होत आहे. पंपाला ट्रॅकिंग सिस्टिम बसवण्यात आली आहे, फेज फॉल्ट झाल्यास मोटार आपोआप बंद होते, पाणी संपल्यावर मेसेजद्वारे अलर्ट मिळतो, त्यानंतर मोबाईलवरूनच मोटार बंद करता येते. सिंगल फेज, थ्री फेज, कृषीपंपाचे कीट चोरीला गेल्यास तेही आपण शोधू शकतो. या कृषीपंपामध्ये ३० पेक्षा जास्त सुविधा या विद्यार्थ्यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत.

### विद्यार्थ्यांच्या संकल्पनांना वाव

कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यात ४ हजार ७०० औद्योगिक कंपन्या आहेत. पण दर वर्षी शिवाजी विद्यापीठातून पाच लाख विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यामुळे प्रत्येकाला नोकरी मिळणे शक्य नाही. लाखो विद्यार्थी आज बेरोजगार आहेत. म्हणून या विद्यार्थ्यांच्या हाताला काम मिळावे, स्वत:चा व्यवसाय सुरू करता यावा यासाठी विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटर कार्यरत आहे. या सेंटरवरच्या माध्यमातून प्रशिक्षण देवून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवले जाते. विद्यार्थ्यांच्या संकल्पना संशोधनाच्या माध्यमातून साकारल्या जात आहेत.

- औद्योगिक कंपन्यांसह घरातही होणार वीजबचत
- इतर एलईडीपेक्षा दुप्पट प्रकाश
- कृषीपंपाचे नियंत्रण आता एका क्लिकवर

### विद्यार्थी असतानाच संशोधनाचे बाळकडू

शिवाजी विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी दशेतच संशोधनाचे बाळकडू दिले जात आहे. १२० ल्युमेन परवॅट क्षमतेची एलईडी बल्ब तयार करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागला आहे. संशोधन यशस्वी झाल्यानंतर ग्राहक मिळत गेले. स्पर्धेच्या युगात नोकऱ्या मिळत नाहीत, म्हणून विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळून स्वत:चा व्यवसाय केला पाहिजे.

**– संकेत शिंदे (विद्यार्थी, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग)**



कोल्हापूर : 'सोक्टास इंडिया 'तर्फे शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रास निधी देण्यात आला. त्यावेळी उपस्थित चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी.

# 'सोक्टास'कडून विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राला दोन लाखांचा निधी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने कौशल्य विकासाच्या अनुषंगाने चालवलेले कार्य महत्त्वाचे असून त्याला अधिक चालना देण्यासाठी 'सोक्टास' कंपनीच्या व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दोन लाखांचा निधी विद्यापीठास प्रदान करताना अत्यानंद होतो आहे, अशी भावना कागल येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सोक्टास इंडिया प्रा. लि. या कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांनी येथे व्यक्त केली.

सोक्टास कंपनीतर्फे व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत विद्यापीठाच्या कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी दोन लाखांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्याचा कार्यक्रम सोमवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

गुप्ता म्हणाले, सामाजिक दायित्वाच्या भावनेतून उद्योगाकडून देण्यात येणारा निधी योग्य हातात पडून त्याचा योग्य विनियोग व्हावा, अशी कंपनीची भावना आहे. त्यातूनच विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत युवकांसाठी राबविण्यात येणारे अनेक उपक्रम पाहण्यात आले. केंद्र सरकारच्या 'स्कील इंडिया' या उपक्रमांतर्गत अनेक उपक्रम विद्यापीठाकडून राबविण्यात येतात. त्याला मदत म्हणून आम्ही ही मदत विद्यापीठाला देण्याचे ठरवले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सोक्टास कंपनीने अत्यंत विश्वासाने विद्यापीठाला हे अर्थसाह्य केले आहे. त्याचा विनियोग कौशल्य विकास केंद्रातर्फे योग्य कारणांसाठी केला जाईल. अशा प्रकारे व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या साहाय्याने 'स्कील ऑन व्हील्स'सारख्या विविध उपक्रमांची व्याप्ती वाढवणे शक्य आहे. त्या दृष्टीनेही प्रयत्न करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अधिष्ठाता व कौशल्य विकासचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# यशवंतराव पाटील कॉलेजचा ५ रोजी पदवीदान सोहळा

**सोळांकूर / वार्ताहर :**

येथील यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालयात शुक्रवार, दि. ५ रोजी सकाळी १० वाजता पहिला पदवीदान समारंभ होणार आहे. अध्यक्षस्थानी व्यंकनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव ए. वाय. पाटील असणार आहेत, तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थाध्यक्ष सरपंच आर. वाय. पाटील व शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. एस. डी. डेळेकर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी पदवीप्राप्त महाविद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. जी. जी. चौगले व परीक्षा विभागप्रमुख डॉ. अतुल कांबळे यांनी केले आहे. विद्यापीठाने जाहीर केल्याप्रमाणे पहिल्यांदाच महाविद्यालयात पदवीदान सोहळा पार पडत आहे. या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती महाविद्यालयाकडून देण्यात आली आहे.

लोकमत

# फार्मसी कॉलेजच्या १४ विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचगाव :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर येथील फार्मसीच्या १४ विद्यार्थ्यांची टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस (मुंबई) या कंपनीत निवड झाली.

भारती विद्यापीठ येथे प्लेसमेंट सेल या विभागामार्फत शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व फार्मसी महाविद्यालयातील बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी भारतातील नामांकित कंपनी टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस या कंपनीमध्ये क्लिनिकल डाटा मॅनेजर या पदासाठी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, रत्नागिरी व सातारा जिल्ह्यांतील १९ फार्मसी महाविद्यालयांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ३२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

यावेळी कंपनीचे कार्यकारी अधिकारी नीलम, प्रियांका शिंगाडे, अनुपम कांबळे, मनोहर चव्हाण आदी उपस्थित होते. तसेच प्लेसमेंट सेलचे विभागप्रमुख अनिलकुमार शिंदे, डॉ. सचिन पिशवीकर, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 7 Apr 02, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

संक्षिप्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना सोक्टास कंपनीचे सदानंद गुप्ता आदी.

(छाया: तय्यब अली)

# कौशल्य विकास केंद्रासाठी 'सोक्टास' कडून दोन लाख रुपयांचा निधी प्रदान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अतंर्गत दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश सोक्टास कंपनीतर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाच्या कौशल्य विकासाच्या कार्याला अधिक चालना देण्यासाठी हा निधी देताना आनंद होत असल्याचे सोक्टास इंडिया कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांनी सांगितले. यावेळी डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागप्रमुखपदी रवींद्र भणगे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागप्रमुखपदी प्रा. डॉ. रवींद्र पांडुरंग भणगे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. प्रा. डॉ. प्रकाश पवार यांचा विभागप्रमुखपदाचा कालावधी दि. ३१ मार्च रोजी संपला आहे. डॉ.



भणगे यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले. बाजारभोगाव (ता. पन्हाळा) हे डॉ. भणगे यांचे मूळ गाव. सन २०१३ मध्ये विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. सन २०१६ मध्ये ते प्राध्यापक झाले. त्यापूर्वी त्यांनी राजाराम महाविद्यालय, विवेकानंद शिक्षण संस्था, शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था (अमरावती) येथे काम केले आहे. नवज्योत या संशोधन पत्रिकेचे ते संपादक आहेत. 'आंतरराष्ट्रीय राजकारण' असा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे

Hello Kolhapur
Page No. 8 Apr 02, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठातील कौशल्य विकासाला बळ

## 'सोक्टास'कडून दोन लाखांचा निधी : विविध उपक्रमांना मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात कौशल्य विकासाच्या अनुषंगाने सुरु असलेल्या उपक्रमाला बळ मिळाले आहे. हातकणंगले-कागल पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सोक्टास इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दोन लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्रदान केला आहे.

या कंपनीच्यावतीने चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांनी विद्यापीठाच्या कौशल्य व औद्योगिक विकास केंद्रासाठी दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहातील या कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

गुप्ता म्हणाले, विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत युवकांसाठी राबविणारे अनेक उपक्रम पाहण्यात आले. त्याला मदत म्हणून आम्ही हा निधी देण्याचे ठरविले. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, या निधीचा विनियोग कौशल्य विकास केंद्रातर्फे योग्य कारणांसाठी केला जाईल. या कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, पी. एस. पाटील, भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# राज्यशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. रवींद्र भणगे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागप्रमुखपदी डॉ. रवींद्र भणगे यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. प्रकाश पवार यांचा तीन वर्षाचा कालावधी संपल्याने रोटेशननुसार सोमवारी डॉ. भणगे यांनी विभागप्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारला.



डॉ. भणगे २०१३ पासून शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी राजाराम कॉलेज, विवेकानंद शिक्षण संस्था, अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था या ठिकाणी राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या या वाटचालीमध्ये डॉ. वासंती रासम, डॉ. भारती पाटील. डॉ. प्रकाश पवार यांचे सहकार्य लाभले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी नेमणूकपत्र प्रदान केले.